महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महापारेषण समाचार

वर्ष-७ अंक-८ मार्च-जून-२०१३

**प्रिय कर्मचारी बंधु-भगिनींनो,**

महापारेषणच्या ८ व्या वर्धापण दिनाच्या आणि भारत देशाच्या ६७ व्या स्वातंत्र्य दिनाच्या सर्वाना मनपूर्वक शुभेच्छा.

महापारेषण कंपनीची स्थापना जून २००५ साली झाली. त्यावेळी महापारेषण कंपनीमध्ये एकूण ४६४ विविध क्षमतेचे उपकेंद्रे, ५५७५९ एम.व्ही. ए. परीवर्तन क्षमता व ३५०२७ सर्किट कि.मी. पारेषण वाहिन्या एवढी पायाभूत सुविधा होती. त्यानंतर २००६-०७ पासून कंपनीने पारेषण वाहिन्यांचे जाळे व वीज परीवहन करण्याची परिवर्तन क्षमता वाढविण्याचे दृष्टीने विशेष नियोजन केले. त्यासाठी आर्थिक सहाय्यतेसाठी विविध वित्त संस्थाकडे जसे पाठपुरावा करुन प्रकल्पासाठी निधी मंजूर करुन घेतला. त्यामुळे २००६-०७ ते २०१२-१३ या एकंदर ७ आर्थिक वर्षामध्ये आपण ३१.०३.२०१३ अखेर एकूण ११६ विविध क्षमतेचे उपकेंद्रे, ६४६९ सर्किट कि.मी. व ४१६९० एम.व्ही.ए. एवढी परिवर्तन क्षमतेची वाढ केली आहे. आर्थिक वर्ष २०१०-११ ते २०१२-१३ या कालावधीमध्ये अनुक्रमे १६,२४ व २५ उपकेंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत. तसेच ९३५, १६९६ व १६२६ सर्किट कि.मी. वीज वाहिन्या कार्यान्वीत करण्यात आल्या. ही प्रगती मागील आर्थिक वर्षाच्या प्रगतीपेक्षा मोठया प्रमाणात व उल्लेखनिय आहे.

वरील प्रगती साध्य करतेवेळी असे निदर्शनास आले आहे की, अधिकांश प्रकल्प विहित कालावधीमध्ये पूर्ण करता आला नाही व त्याची कारणमीमांसा केली असता, प्रामुख्याने पुढील अडचणी दिसून आल्या.

मार्ग प्रवेश हक्काची प्रकरणे वेळेच्या आत सादर न करणे. सादर केलेल्या प्रकरणांसाठी योग्य तो पाठपुरावा न केल्यामुळे प्रकरणांचा निकाल विलंबाने लागणे. प्रकरणांचा निकाल लागल्यानंतर मनोरा पायाभरणीसाठी उशिरा सुरुवात करणे. काही प्रकरणांचा निकाल कंपनीच्या बाजूने लागल्यानंतरही काही शेतकरी मनोरा उभारणीच्या कामामध्ये अडथळा आणतात. त्यासाठी जातीने लक्ष घालून पोलिस संरक्षण मागणे आवश्यक असते व त्यासाठी पोलिस विभागाकडे पाठपुरावा करावा लागतो. त्याबाबत आपण कमी पडत आहोत. प्रकल्पाच्या कामामध्ये काही ठिकाणी वनांचा समावेश असतो. त्यासाठी विहित नमुन्यामध्ये वन विभागाकडे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी प्रस्ताव पाठवावा लागतो. प्रस्ताव योग्यरित्या न पाठविल्यामुळे पत्रव्यवहारामध्ये बराच कालावधी जातो व ना हरकत प्रमाणपत्र मिळण्यास विलंब होतो. याबाबत सतत पाठपुरावा केला जात नाही. काही वाहिन्या उभारतेवेळी रेल्वे लाईनला ओलांडून वाहिनी उभारण्याचे काम करावे लागते. त्यासाठी रेल्वे विभागाची परवानगी घ्यावी लागते. परंतु त्याबाबतचा प्रस्ताव आपल्यातर्फे रेल्वे विभागाकडे पाठविण्यास बराच विलंब होतो व त्याबाबत आपण पाठपुरावा करण्यामध्ये कमी पडत आहोत. पी.टी.सी.सी. चा प्रस्ताव वेळेच्या आत संबंधित खात्यांकडे जात नसल्यामुळे प्रस्ताव मंजूर होण्यास बराच विलंब लागतो.

आपण २०११-१६ या पंचवार्षिक योजनेमध्ये आपल्याला काय काम करावयाचे आहे, याबाबत प्रस्ताव आपण तयार केला असून त्यावर वेळोवेळी सविस्तर चर्चादेखील झाली आहे. त्यामुळे प्रत्येक वर्षामध्ये आपले काय उद्दिष्ट होते व त्यापैकी आपण काय साध्य केले याबाबतचा आढावा प्रत्येकाने घेणे आवश्यक आहे. कुठल्याही परिस्थितीत आपल्याला आपले वरील उद्दिष्ट साध्य करावयाचे आहे. वरील उद्दिष्ट साध्य करण्यास आपल्या मागील कामांच्या त्रुटी लक्षात घेऊन त्या त्रुटी पुढील कामांमध्ये होणार नाहीत याबाबत आपल्याला दक्षता घ्यावी लागेल. तसेच आगामी कामांचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आपल्याला आगाऊ नियोजन करणे आवश्यक आहे. त्यामध्ये विशेष करुन आगामी उपकेंद्राची जागा निश्चित करुन ती जागा महसूल विभागाशी संपर्क साधून लवकरात लवकर आपल्या ताब्यात घेणे. जागा निश्चित झाल्यानंतरच आपल्याला पुढील कार्यवाही करता येणे शक्य होईल. उपकेंद्राला लागणा-या वाहिनीचे सर्वेक्षण करणे व आगामी प्रकल्पाचे अंदाजपत्रक तयार करुन वरिष्ठ कार्यालयाकडून त्याबाबतचा प्रस्ताव मंजूर करुन घेणे. उपकेंद्राच्या व सहयोगी वाहिनीच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी प्राप्त करुन घेणे. उपकेंद्र व सलग्न वाहिनीच्या कामासाठी निविदा काढून त्यावर योग्य ती कार्यवाही करुन संबंधित कंत्राटदाराला सदर कामाचे कंत्राट देणे. कंत्राटदाराकडून सदर काम कशाप्रकारे विहित कालावधीमध्ये करणार त्याबाबतचा नियोजनबध्द आराखडा प्राप्त करुन घेणे. कंत्राटदाराच्या कामाच्या प्रगतीवर लक्ष ठेवून त्याबाबत वेळोवेळी आढावा घेणे व कामामध्ये काही समस्या निर्माण झाल्यास त्याबाबत आपापसात चर्चा करुन समस्येचे निराकरण करणे.



आर्थिक वर्ष २०१३-१४ यामध्ये आपण २५ उपकेंद्रे, ८५०० एम.व्ही.ए. परिवर्तन क्षमता वाढविणे व १६५० सर्किट कि.मी. वीज वाहिनी उभारण्याचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. हे उद्दिष्ट आपण सांघिकरित्या काम करुन निश्चित साध्य करु अशी अपेक्षा आहे. तसेच महापारेषण कंपनीने काही महत्वाकांक्षी योजना मंजूर केल्या आहेत. जसे ७६५ के.व्ही. क्षमतेचे औरंगाबाद येथे उपकेंद्र उभारणे, ४०० के.व्ही. क्षमतेचे हिंजेवाडी येथे (जी.आय.एस) उपकेंद्र उभारणे, ४०० के.व्ही. क्षमतेचे खुडूस येथे उपकेंद्र उभारणे, ४०० के.व्ही. क्षमतेचे तापटीतांडा, ४०० के.व्ही. क्षमतेचे नांदेड येथे उपकेंद्र उभारणे, ४०० के.व्ही. क्षमतेचे चंद्रपूर स्विचींग उपकेंद्र उभारणे. तसेच २२० के.व्ही. च्या २५ उपकेंद्राचे काम व १३२ के.व्ही. च्या २० उपकेंद्राचे काम सध्या प्रगतीपथावर असून येत्या दोन ते तीन वर्षात ही उपकेंद्रे कार्यान्वीत होणे अपेक्षीत आहे.

अशा हया भरीव कामगिरीकरीता आपल्याला अडचणीवर मात करुन नियोजनबध्द कृती कार्यक्रम राबविता आला पाहिजे तरच आपल्याकडून चुकांची पुनरावृत्ती होणार नाही व आपले प्रकल्प वेळेत कार्यान्वीत होतील.

शुभेच्छासह.

**अरविंद सिंह**
**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**

# महाराष्ट्र व महापारेषणच्या महत्वकांक्षी ७६५ केव्ही उपकेंद्र एकतुनी या प्रकल्पाचे भुमिपूजन मा.उप मुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे हस्ते संपन्न





७६५ केव्ही उपकेंद्र एकतुनी ता.पैठण जि. औरंगाबाद येथील भूमिपूजन दि. १२.०७.२०१३ रोजी मा.उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे हस्ते संपन्न झाले.

७६५ केव्ही चे पाहिले उपकेंद्र उभारणारी महापारेषण ही आपली कंपनी ही देशातील एकमेव राज्यस्तरावरील कंपनी आहे.



सदरील कार्यक्रम मा.संजय वाघचौरे आमदार पैठण यांच्या अध्यक्षतेखाली तसेच मा.ना.राजेशभैया टोपे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री व मा.ना. फौजिया खान शालेय शिक्षण महिला व बालविकास राज्यमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. मुख्य कार्यालयाचे मा.श्री. उत्तम झाल्टे, संचालक (संचलन) व मा.श्री.ओमप्रकाश एम्पाल संचालक (प्रकल्प) यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मार्गदर्शन केले.

७६५ केव्ही च्या या प्रकल्पामुळे औरंगाबाद जालना औद्योगिक वसाहती बरोबरच दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीअल कॉरीडोर ची अपेक्षीत विजेची मागणी पुर्ण करण्यासाठी या उपकेंद्राचा हातभार लागणार आहे. यातील अंदाजे ३००० मेगावॅट औरंगाबाद परिसरात वापरून अंदाजे ५००० मेगावॅट मुंबई, पुणे इत्यादी ठिकाणी पाठवली जाईल.

२०१२-१७ या पंचवार्षिक योजने अंतर्गत विदर्भात एकुण ८१३० मेगावॅट एवढी विज निर्मिती होणार आहे. विज वाहून नेण्याकरीता तिरोड ते औरंगाबाद ही ६६० कि.मी. एवढया लांबीच्या ७६५ केव्ही च्या दोन वाहिन्या या उपक्रमा अंतर्गत टाकल्या जातील.

या संपुर्ण प्रकल्पाबाबत बोलतांना मा.उप मुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी जनतेला याच्या उपयुक्ततेबद्दल माहिती दिली. तसेच आपल्या समाजासाठी व आपल्या पुढील भवितव्यासाठी अशा प्रकल्पांना व विजेचे मनोरे उभारण्यासाठी जमिनी देणे बाबत शेतकऱ्यांना आवाहन केले.

सदरील भुमिपूजन समारंभासाठी पावसाने हजेरी लावलेनी असतांना देखील मोठया प्रमाणावर जनसमुदाय उपस्थित होता.

हा भूमिपूजन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी औरंगाबाद परिमंडळाचे मुख्य अभियंता, श्री.रोहिदास मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक्षक अभियंता, श्री.अरुण वाघमारे, श्री.तेजराव लव्हाळे, नरेंद्रकुमार रामटेके, शशांक जेवळीकर यांनी तसेच त्यांच्या सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गासह परिश्रम घेतले.

## नाशिक पारेषण परिमंडळातर्फे धुळे जिल्हात २२०केव्ही अतिउच्च दाबाचे उपकेंद्र व १३२ केव्ही दाबाची विद्युत वाहिनी कार्यान्वित



धुळे जिल्हयातील साक्री तालुक्यात मौजे शिवाजीनगर परिसरात महापारेषण कंपनी नाशिक पारेषण परिमंडळातर्फे २२०केव्ही अति-उच्च दाबाचे उपकेंद्र व १३२केव्ही उच्च दाबाची १३.१ कि.मी. लांबीची विद्युत वाहिनी दिनांक १६/०३/२०१३ रोजी कार्यान्वित करण्यात आली.

या उपकेंद्रात महानिर्मिती कंपनीतर्फे सौर उर्जेद्वारे निर्माण झालेली वीज ग्रहण करून व अति-उच्च दाबात परिवर्तित करून धुळे जिल्हयात सदर विद्युत शक्तीचे वहन केले जाणार आहे. सदर उपकेंद्राची स्थापित क्षमता ४००एमव्हीए इतकी असून त्यात २००/१३२केव्ही, १००एमव्हीए क्षमतेचे दोन व २००/३३केव्ही, १०० एमव्हीए क्षमतेचे दोन असे एकूण चार रोहित्र आहेत. सार्वजनिक क्षेत्रातील या प्रकारचा हा महाराष्ट्र राज्यातील पहिलाच प्रकल्प आहे.

या उपकेंद्रात संपूर्णपणे आधुनिक प्रणालीचा वापर करण्यात आलेला असून महापारेषण कंपनीतर्फे २२०केव्ही शिवाजीनगर उपकेंद्र नियोजित वेळेत पूर्ण करण्यात आलेले आहे. या उपकेंद्रासाठी अंदाजे रु. १४३ कोटी इतका खर्च महापारेषण कंपनीस आला आहे.

सदर उपकेंद्राचे कार्यान्वयन नाशिक पारेषण परिमंडळाचे मुख्य अभियंता मा.श्री.एम.एल. सानप यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. या प्रसंगी महापारेषण कंपनीचे अधीक्षक अभियंता श्री.जे.जी. चुडे, श्री.जे.एस. पाटील, श्री.आर.अेम. तिजारे, सहा. महाव्यवस्थापक - विवले श्री.एम.बी. घोलप, कार्यकारी अभियंता, श्री. एल.पी.तळेले, श्री.व्ही.सी. पवार, श्री.जे.एफ. राठोड, श्री.पी.एस. भोळे व महानिर्मिती कपंनीचे अभियंता, तसेंच मेसर्स अेरवा कपंनीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## राज्यस्तरीय Reward पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम





दि. २७.०६.२०१३ रोजी प्रेक्षागृह, प्रकाशगड, मुंबई येथे मा.श्री. अजय मेहता, प्रभारी प्रधान सचिव (ऊर्जा) व व्यवस्थापकीय संचालक महावितरण यांच्या हस्ते राज्यस्तरीय Reward पारितोषिक वितरण सोहळा, महापारेषण अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री.अरविंद सिंह यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडण्यात आला.

हया प्रसंगी मोठया संख्येने संपूर्ण महाराष्ट्रातून नामंकित कर्मचारी/अधिकारी त्यांच्या प्रमुखांसोबत उपस्थित राहीले.

मुख्य कार्यालयाने हया कार्यक्रमात जाहीर केलेल्या "Knowledge Sharing Scheme" मधील विजेतांना सुद्धा प्रमुख पाहुण्यातर्फे पारितोषिक वितरण करून गौरविण्यात आले.

ह्या प्रसंगी महापारेषणची प्रगती एका (Documentary) चित्रफितीतून सर्वांना दाखविण्यात आली.

प्रमुख पाहुण्यांनी त्यांच्या भाषणामध्ये महिलांसाठी राबविलेल्या उपक्रमाबद्दल, "Knowledge Sharing Scheme", व MSETCL च्या Documentary बद्दल कौतुक करून मौलीक मार्गदर्शन केले.

## १३२ के.व्ही. उपकेंद्र जिंतूर येथे ५० एम.व्ही.ए. क्षमतेचा पॉवर ट्रान्सफॉर्मर कार्यान्वीत



महारापारेषण कंपनीच्या १३२ के.व्ही. उपकेंद्र जिंतूर येथे जूना १३२/३३ के.व्ही. २५ एम.व्ही.ए. क्षमतेचा पॉवर ट्रान्सफॉर्मर बदलून त्याजागी नवीन १३२/३३ के.व्ही. ५० एम.व्ही.ए. क्षमतेचा पॉवर ट्रान्सफॉर्मर श्री.रोहिदास मस्के, मुख्य अभियंता, औरंगाबाद परिमंडळ, यांच्या नेतृत्वाखाली श्री.तेजराव लवाळे, अधीक्षक अभियंता, औरंगाबाद मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.एस.एस. भोख, प्रभारी कार्यकारी अभियंता, संचलन व सुव्यवस्था विभाग परभणी तसेच श्री.मार्कडे, कार्यकारी अभियंता, चाचणी विभाग नांदेड श्रा.सेंदुरवाडकर उपकार्यकारी अभियंता यांच्या प्रमुख उपस्थीत श्री.अभिजीत घुगे, सहाय्यक अभियंता, १३२ के.व्ही. उपकेंद्र जिंतूर यांनी नूकताच यशस्वीरित्या कार्यान्वीत केला. सदर पॉवर ट्रान्सफॉर्मर च्या वेगवेगळया चाचण्या चाचणी विभागाचे श्री.सोनकांबळे, उपकार्यकारी अभियंता व श्री.पोटे उपकार्यकारी अभियंता तसेच श्री.गारजकर सहाय्यक अभियंता व श्री.मिरजगावे यांनी घेतल्या. सदर पॉवर ट्रान्सफॉर्मर कार्यान्वीत झाल्यामुळे १३२ के.व्ही. उपकेंद्र जिंतूरची क्षमता ८५ एम.व्ही.ए. वरून ११० एम.व्ही.ए. ईतकी वाढली आहे. जिंतूर परिसरातील वाढती मागणी लक्षात घेता व सुरळीत विद्युत पुरवठा देण्याच्या उद्देशाने श्री.अभिजीत घुगे, सहाय्यक अभियंता, १३२ के.व्ही. उपकेंद्र जिंतूर यांनी विशेष परिश्रम घेतले व सदर पॉवर ट्रान्सफॉर्मर यशस्वीरित्या कार्यान्वित केला आहे. सदर कामात त्यांना १३२ के.व्ही. उपकेंद्र जिंतूर चे ऑपरेटर श्री.जावेद पठाण, श्री.मंगेश जळेकर, श्री.डि.व्ही. मत्ते, श्री.एम.एम. देवगावकर तसेच कनिष्ठ तंत्रज्ञ श्री.प्रभाकर शिंदे, पि.डी. लोखंडे, आर.व्ही. हळदे, श्री.व्ही.एन. बिकनुरे व कु. एन.एम. मते यांनी सहकार्य केले.

सदर ट्रान्सफॉर्मर उभारणी वेळेत करून पॉवर ट्रान्सफॉर्मर कार्यान्वीत केल्या बद्दल श्री.एस.एस. भोख प्रभारी कार्यकारी अभियंता यांनी १३२ के.व्ही. उपकेंद्र जिंतूर येथील सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

## मानव संसाधन विभागातील वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या दि.०५.०६.२०१३ रोजी मुख्य कार्यालयात झालेल्या समन्वय सभेत संचालक संचलन श्री.यु.जी. झाल्टे यांचे मौलीक मार्गदर्शन

आजच्या मानव संसाधन विभागाच्या बैठकीसाठी सांघिक कार्यालय तसेच सातही परिमंडलातून आलेल्या सर्व अधिकाऱ्यांचं मी स्वागत करतो.

मानव संसाधन विभाग हा कुठल्याही कंपनीचा कणा असतो. कंपनीत उच्च तांत्रिक कौशल्य असलेले मनुष्यबळ भरती करणे. असलेल्या मनुष्यबळाला दैनंदिन कामकाज व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी वेळोवेळी प्रशिक्षित करणे असे अनेक उपक्रम मानव संसाधन विभाग वेळोवेळी राबवत असतो. एखाद्या कंपनीचा मानव संसाधन विभाग किती कार्यक्षम आहे, त्यावरून त्या कंपनीची ताकद ठरत असते. कंपनीत काम करणारा प्रत्येक अधिकारी-कर्मचारी बाहेर जाऊन कंपनीबद्दल आपली बरी-वाईट मते मांडत असतात. त्यांच्या मतांवरून बाहेरील व्यक्ती आपल्या कंपनीबद्दलचे मत बनवत असते. हे सर्व समजून घेऊन मानव संसाधन विभागाने कंपनीत काम करणाऱ्या प्रत्येक अधिकारी-कर्मचाऱ्याला योग्य त्या प्रकारची सेवा दिली पाहिजे. यामुळे कंपनीतील अधिकारी-कर्मचारी अधिक कार्यक्षम होऊन त्याचा चांगला परिणाम कंपनीच्या उत्पादकतेवर होईल आणि कंपनीच्या इमेज बिल्डिंगसाठीही त्याचा उपयोग होईल असे मला वाटते.

कर्मचारी कंपनीतून निवृत्त होत असताना समाधानी वृत्तीने बाहेर पडला पाहिजे हे मानव संसाधन विभागचे ध्येय असायला हवे. सुमारे ३०-३५ वर्षे कंपनीची प्रामाणिकपणे सेवा केल्यावर अधिकारी-कर्मचारी सेवानिवृत्त होत असताना पी.एफ, ग्रॅच्युइटी, रजेचे वेतन यांसारखे आर्थिक विषय हाताळताना मानव संसाधन विभागने संवेदनशीलता दाखवायला हवी. कर्मचारी निवृत्त होत असताना त्यांच्यावर अनेक कौटुंबिक जबाबदाऱ्या असतात, कुणाची मुलं उच्च शिक्षण घेत असतात, कुणाच्या मुला-मुलीचं लग्न असतात कुणाला नवीन घर बांधायचं असतं. अशी अनेक कारणे असतात ज्यासाठी पैशांची आवश्यकता भासत असते. त्यामुळे निवृत्त होणाऱ्या व्यक्तीला त्याच्या नावावर असलेला पैसा तातडीने मिळावा यासाठी मानव संसाधन विभागाने योग्य ती खबरदारी घ्यायला हवी.

आपल्या कंपनीत कर्मचारी सोडून जाण्याचे प्रमाण तसे खूप कमी आहे. तरीही जे कर्मचारी सोडून जातात, त्यांच्याकडून आवश्यक त्या कागदपत्री पूर्तता झाल्यावर त्यांनाही आर्थिक बाबींमध्ये मानव संसाधन विभगाने उचित सहकार्य करायला हवे. यामुळे कंपनी सोडून जाताना अशा अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या मनात कंपनीविषयी नेहमी चांगली भावना राहिल अशी मला आशा वाटते.

कार्यालयीन आदेश, प्राधिकारी अधिकारी यांचा निर्णय झाल्यावर त्वरीत काढणे, काही कारणास्तव अडचणी असतील तर संदर्भित व्यक्तीस सांगणे, उच्चवेतन श्रेणीची प्रकरणे त्वरीत निकाली काढणे, मृत कमचाऱ्यांची देयके वेळेत अदा करणेबाबत काळजी घेणे, कर्मचारी अभिलेखा अद्यायावत ठेवणे इत्यादी मूलभूत बाबीवर मानव संसाधन विभागाकडनू चोखंदळपणे कार्यवाही व्हावी अशी मूलभूत अपेक्षा आहे.

मानव ससांधन विभागास पुढील कार्याकरिता शुभेच्छा.

**यु.जी. झाल्टे, संचालक (संचलन)**

## "Knowledge Sharing Scheme" पारितोषिक वितरण



महापारेषण कंपनीने (Knowledge) ज्ञानाला प्रोत्साहीत करण्याकरीता वर्षे २०११-२०१२ पासून "Knowledge Sharing" योजना कार्यान्वीत केली.

या योजने अंतर्गत झालेल्या विजेतांना पारितोषिक दि. २७.०६.२०१३ रोजी राज्यस्तरीय Reward पारितोषिक वितरण कार्यक्रमात श्री.अजय मेहता, व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, प्रभारी प्रधान सचिव (ऊर्जा) यांच्या हस्ते देण्यात आले.

सर्व विजेतांचे महापारेषण परिवारापतर्फे मनपूर्वक कौतुक!!!

## नाशिक परिमंडळ येथे मोफत रक्तगट व हाडांचा ठिसूळपणा तपासणी शिबीर संपन्न

अ.ऊ.दा. बांधकाम नि. (संवसु) परिमंडल परिमंडळ नाशिक येथे दिनांक २०.०६.२०१३ रोजी अश्विनी ॲक्सीडेंट हॉस्पीटल, नाशिक यांचे सौजन्याने मोफत रक्तगट तपासणी व हाडांचा ठिसूळपणा तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबीराचे उद्घाटन नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री.एम.एल. सानप यांचे हस्ते करण्यात आले. सदरचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अश्विनी ॲक्सीडेंट हॉस्पीटल, नाशिक यांचे विशेष योगदान लाभले.

तसेच सदरच्या शिबिरास परिमंडळांतर्गत कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदविला.

## वाशी परिमंडळ येथे ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती'' उत्साहात साजरी



दि. १४ एप्रिल २०१३ रोजी अउदा बांधकाम-नि-संवसु परिमंडळ, वाशी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२२ वी जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी श्री.विकास बढे, मुख्य अभियंता वाशी यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला व सर्व कर्मचाऱ्यांस उद्बोधन केले. या कार्यक्रमास श्री.आनंद सहस्त्रबुद्धे, सहा. मुख्य सुरक्षा अधिकारी, श्री.जगन्नाथ जगताप, श्री.मुरलीधर सावरकर, उपव्यवस्थापक (मासं), श्री.सुभाष सोनवणे, प्रमुख लिपीक हे व इतर कर्मचारी उपस्थित होते.

## गाव

प्रत्येकाच्या मनात आपल्या गावसाठी
एक हळवा कोपरा असतो
शहरात राहूनही तो रोजच्या रोज
उगवत व मावळत असतो ।।१।।

स्वत: नाही पण मन नेहमीच गावाला गेलेले असते
व तेव्हाचे गाव शोधत असते
पण काळाच्या ओघात आणि
जागतिकीकरणाच्या वेगात गावातील सारेच बदलुन गेलेले असते ।।२।।

आता नागपंचमीचा सण झोपळयांविणा साजरा करतात
विचारले असता आम्हाला आमचे कर्तव्य असते असे सांगतात
कर्तव्य हे प्रत्येकालाच असते
पण म्हणून काय आपण आपल्या गावाचे नाविण्यपण जपायचे नसते ? ।।३।।

पूर्वी पावसामुळे शाळेला सुट्टी मिळायीच हमखास
पण आता तर जमीनीला पावसाची आस ।।४।।

हे सगळे दृष्टचक्र आपण थांबवू शकतो
प्रत्येक जण दरवर्षी एक झाड लावू तर शकतो
फक्त झाड लावून कसे चालेल
त्याची योग्य निगा घेवून वाढवावे तर लागेल ।।५।।

- सौ. उमा चं. सुरडकर (क. तंत्रज्ञ)
१३२केव्ही उपकेंद्र, खराडी (पुणे)

## जागतिक महिला दिनानिमित्त संदेश

स्त्रीभ्रूण हत्या विरोधात करू नवा संकल्प
बहुगुणी, सक्षम व कर्तृत्ववान महिलेच्या शिवाय नाही विकल्प ।।१।।

बदला तिच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोणन,
बहुमानित करा त्यांना मुक्ता व हिरकरणी सन्मान देऊन ।।२।।

करू त्यांचे जीवन संतुलित, शिक्षण व सुरक्षाकवच देऊन,
कोटी कोटी प्रणाम अशा या स्त्री शक्तीला नमून ।।३।।

आत्मभान व आत्मनौती करणाऱ्या महिलांचा आज बाळगा अभिमान,
साजरा करू सबलीकरणाचे व सक्षमीकरणाचे राबवून अभियान ।।४।।

- श्रीमती सुमन डी. गायकवाड
(निवृत्त) वरिष्ठ व्यवस्थापक (मासं)

## कराड येथे 'अग्निशमन सेवा सप्ताह'

दि. १४ ते २० एप्रिल २०१३ या कालावधीत 'अग्निशमन सेवा सप्ताह' पाळण्याबाबत महाराष्ट्र शासनाने आदेश निर्गमित केले होते.

सदर 'अग्निशमन सेवा सप्ताह' या परिमंडलांतर्गत उस्फुर्तपणे पाळण्यात आला. निम्नस्वाक्षरीकाराचे निर्देशानुसार कार्यकारी अभियंते व इतर संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांनी अग्निशमन सेवा सप्ताहाचे आयोजन उत्कृष्ठरित्या केले. सदर कार्यक्रमाची रूपरेषा खालील प्रमाणे होती.




**दिनांक १४.४.२०१३ ते २०.०४.२०१३**

परिमंडलांतर्गत कार्यालये व उपकेंद्रांमध्ये केंद्रीय गृहमंत्रालयाने दिलेल्या घोषवाक्याचे पोस्टर्स/बॅनर्स लावण्यात आले.

**दिनांक १५.०४.२०१३ ते २०.०४.२०१३**

विविध उपविभाग व उपकेंद्रांमध्ये अग्नि आदेशाची ओळख, अग्निशमन सयंत्राचा वापर, आगीपासून निर्माण होणारे धोके टाळण्यासाठी घ्यावयाची दक्षता व त्यावरील उपाय योजना या बाबतचे त्या त्या स्थानिक पातळीवरील प्रशिक्षण देऊन मॉकड्रील घेण्यात आली.



संबंधित सक्षम अधिकाऱ्यानी आपल्या अधिपत्याखालील कार्यालयातील उपकेंद्रातील अधिकारी व कर्मचारी यांना उपलब्ध अग्निशमन सयंत्राची माहिती तसेच प्रशिक्षण देण्यात आले. नायट्रोजन इंजेक्शन अग्निशमन सयंत्राबाबत माहिती देण्यात आली.

४०० के.व्ही.ग्र. केंद्र विभाग तळंदगे येथे हिंदुस्थान मार्केटिंगचे मालक ४००केव्ही कराड रहिवासी वसाहतीमध्ये मे.आदित्य सेल्स एजन्सी, कोल्हापुर, २०० केव्ही उपकेंद्र, विटा येथे फायर ॲकॅडमीचे ढवळेश्वरचे संचालक, ४००केव्ही न्यु कोयना ग्र.केंद्र येथे कोयना



MSPGCL चे अग्निशमन अधिकाऱ्यांमार्फत व अउदा संवसु विभाग, सांगली येथे आपल्या कंपनीच्या अभियंतामार्फत अग्निशमनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अग्निशमनाच्या प्रात्यक्षिकासाठी ४०० केव्ही न्यु कोयना व कराड वसाहतीमधील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील प्रात्यक्षिकासाठी ४०० केव्ही न्यु कोयना व कराड वसाहतीमधील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील सदस्यांचा सहभाग/प्रतिसाद चांगला मिळाला. त्यावेळी घरांमध्ये आगीपासुन संरक्षणा बाबत व प्रतिबंधक उपाय, घरगुती गॅस पासुनचे धोके व त्याबाबत काळजी घेण्याबाबतचे मार्गदर्शनही सदर वसाहतीमधील कर्मचारी/अधिकारी व त्यांच्या कुटूंबियांना करण्यात आले.

# महापारेषण कंपनीचा ८वा वर्धापन दिन विविध कार्यालयात उत्साहात साजरा

## मुख्य कार्यालयात वर्धापन दिन साजरा





मुख्य कार्यालयात आठवा वर्धापन दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. ह्या प्रसंगी मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी मौलीक मार्गदर्शन करून वर्धापन दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. तसेच संचालकांनी सुद्धा ह्या प्रसंगी मार्गदर्शन केले.

ह्या कार्यक्रमाचे आयोजन CIRO Department तर्फे करण्यात आले होते. ह्या प्रसंगी सामाजिक बांधीलकी बाळगुन मोठ्या संख्येने मुख्य कार्यालय कर्मचारी/अधिकारी यांनी रक्तदान करून आपला सहभाग नोंदविला. तसेच ह्या प्रसंगी आयोजित केलेल्या आरोग्य शिबीराचाही लाभ घेतला.

## अउदा संवसु विभाग, सांगली येथे महापारेषण कंपनीचा ८वा वर्धापन दिन समारंभ उत्साहात साजरा






दि. ०६/०६/२०१३ रोजी अउदा सांगली विभागामध्ये महापारेषण कंपनीचा ८व्या वर्धापन दिनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. मा.श्री.सी.एल. कोळी, कार्यकारी अभियंता यांच्या हस्ते केक कापण्यात आला. या निमित्ताने डॉ.दिनेश कामत यांचे 'व्याधीमुक्त आरोग्यदायी जीवन' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. डॉ. कामत यांनी आजकालच्या स्पर्धात्मक युगात आपली होणारी धावपळ त्यामुळे येणारा ताणतणाव यावर मात करत स्वत:ची जीवनशैली कशी बदलता येईल तसेच योग्य आहार व्यायाम तसेच आनंदी आयुष्य कसे जगता येईल यावर विनोदी पद्धतीने टिकाटिप्पणी करीत रोजच्या व्यवहारातील उदाहरणे देऊन योग्य मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमास विभागातील अधिकारी वर्ग तसेच कर्मचारी उपस्थित होते. तसेच उपकेंद्रातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

श्री.पवार यांनी मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## दि. ०६/०६/२०१३ रोजी महापारेषण कंपनीचा ८वा वर्धापन दिन साजरा केल्याबाबत अहवाल





५०० केव्ही उदादिधा ग्रहण केंद्र (संवसु) मंडलातील सर्व अकिधरी/कर्मचारी यांच्या उपस्थितीत श्री.व्ही.एम. पाटील, अधिक्षक अभियंता यांच्या हस्ते केक कापण्यात आला. श्री.एस.एच. कावरे, सहाय्यक अभियंता यांनी कम्युनिकेशन स्किल याविषयातील त्यांच्या संग्रहातील चित्रफित दाखविली व श्री.सी.पी. जाधव, कनिष्ठ अभियंता यांनी त्यांच्या संग्रहातील लाईफ चेंजिंग सेमिनारबाबत चित्रफित दाखवून वाढदिवस अतिशय चांगल्या प्रकार साजरा केला.

कार्यकारी अभियंता श्री.ए.झेड, जागडे, ४०० केव्ही ग्रकें संवसु विभाग पडघे/श्री.डी.ए. रपाटे, उदादिधा आंतर-बाहय विभाग पडघे/श्री.एस.एम. तत्री, उदादिधा चावदु विभाग पडघे/ श्री.ए.व्ही. मडावी, उदादिधा ता. संवसु विभाग राजगुरूनगर व श्री.आर.जे. काटे, उदादिधा ता. संवसु विभाग जालना यांनीसुद्धा विभागीय कार्यालय येथे वाढदिवस साजरा केला.

वाढदिवसानिमित्त श्री.ए.ओ. भारती, वाहनचालक यांना (बिना अपघात वाहनचालक म्हणून) २रा पुरस्कार रु. ५०००/- चा धनादेश देण्यात आलेला आहे.

श्री.वाय.ए. रूद्रकार, उपकार्यकारी अभियंता, प्रशिक्षण केंद्र यांनी पडघा येथे सुरु असलेल्या बॅच नं. ६ सर्व प्रशिक्षणार्थी कनिष्ठ अभियंता यांच्या उपस्थितीत कंपनीचा वाढदिवस साजरा केला असून श्री.वंदन मेंढे, अधिक्षक अभियंता, मुख्य कार्यालय, मुंबई हे उपस्थित होते. तरी वरील कार्यक्रमाचे आयोजन मंडळ कार्यालयातर्फे श्री.दिलीप पाटील, प्रभारी व्यवस्थापक (मासं) व आभार प्रदर्शन श्री.शिवलींग हुंडीवाले यांनी केले.

## कंपनीच्या ८व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने नाशिक परिमंडळ येथे भव्य रक्तदान शिबीर संपन्न




महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचा ८वा वर्धापन दिन व जागतिक रक्तदान दिनाचे औचित्य साधून अउदा बांधकाम नि. (संवसु) परिमंडळ, नाशिक येथे दिनांक १४.०६.२०१३ रोजी भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमाचे उद्घाटन मा.संचालक (प्रकल्प) श्री.ओमप्रकाश एम्पाल, यांच्या हस्ते करण्यात आले, सदर कार्यक्रमाच्या प्रसंगी सांघिक कार्यालयाचे मुख्य अभियंता श्री.आर.डी. चव्हाण, नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता, श्री.एम.एल. सानप, तसेच अधिक्षक अभियंता श्री.तिजारे, श्री.स्वामी, श्री.गुट्टे, श्री.पाटील यांच्यासह अनेक अधिकारी/कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदरचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री.पी.डी. चौधरी सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) श्री.एम.बी. घोलप, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले), श्री.पी.ई. सावकारे कार्यकारी अभियंता, श्री. एस.एस. नवलाखे, उप कार्यकारी अभियंता यांच्यासह परिमंडळ कार्यालयात कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांनी अथक प्रयत्न केले. सदरचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नाशिक रक्त पेढी यांचेही विशेष योगदान लाभले.

सदरच्या रक्तदान शिबीरास नाशिक परिमंडळांतर्गत कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उस्फुर्त प्रतिसाद देऊन मोठ्या संख्येने रक्तदान केले.

## नागपूर परिमंडळा अंतर्गत कंपनीचा ८वा वर्धापन दिन २६ जून २०१३ रोजी संपन्न झाला





नागपूर परिमंडळा अंतर्गत महापारेषण कंपनीचा ८वा वर्धापन दिनांक २६ जून २०१३ रोजी आय.एम.ए. हॉल, नार्थ अंबाझरी रोड नागपूर या ठिकाणी मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाचे उदघाटक म्हणुन मा. एस.जी. केळकर, कार्यकारी संचालक (संचालन) महापारेषण मुंबई कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन श्री.एस.डी. श्रौती, माजी कार्यकारी संचालक महापारेषण मुंबई तसेच मुख्य अतिथी म्हणुन मा.श्री.मोहम्मद अहफाज, माजी मुख्य अभियंता अउदा बांध नि. संवसु परिमंडळ नागपूर हे प्रामुख्याने उपस्थित राहुन अधिकारी/कर्मचारी यांना ''महापारेषण'' कंपनीच्या ८व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा दिल्या आणि वर्तमान स्पर्धेच्या युगात आपल्या कामाचा दर्जा कायम ठेवून पारेषण क्षेत्रात महापारेषण कंपनीने संपूर्ण देशातुन सर्वोच्च स्थान ग्रहण करण्याच्या दृष्टीने प्रयत्नरत राहावे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्तावीक आयोजन समितीचे अध्यक्ष तथा मुख्य अभियंता मा.श्री.एल.एस. सोनकवडे यांनी केले व आयोजन समितीचे सचिव तथा प्रभारी अधिक्षक अभियंता श्री.आर.एस. परूळकर यांनी आभार मानले.

वर्धापन दिनांच्या कार्यक्रमाच्या उदघाटनानंतर लगेच रक्तदान शिबीर तसेच आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले त्यामध्ये एकूण ४३ अधिकारी/कर्मचारी हयांनी ''रक्तदान'' केले तसेच एकूण २४० अधिकारी/कर्मचारी हंयानी आरोग्य तपासणी करून घेतली. रक्तदान करीता जिवन ज्योती रक्तपेढी माधवनगर नागपूर तसेच आरोग्य तपासणी करीता ''व्होकहार्ट'' हॉस्पीटल नागपूर यांच्या डॉक्टरांचा तसेच त्यांच्या स्टॉफचे सहकार्य लाभले. ''व्होकहार्ट'' हॉस्पीटल नागपूर हयांनी आरोग्य तपासणी मध्ये मधुमेह, वी.पी., ई.सी.जी. इत्यादी तपासणी विनामुल्य उपलब्ध करून दिली.

मध्यंतरी १ तासाच्या कालावधीमध्ये सर्व कर्मचाऱ्यांचा आत्मविश्वास वाढविण्याच्या दृष्टीकोनातुन श्री.संदीप माहेश्वरी यांची Life Changing Experience बाबतची CD दाखविण्यात आली. सहभोजनाच्या कार्यक्रम आटोपल्यानंतर दुपारी ३ ते ६ पर्यंत श्री.विनयराज वाघमारे यांच्या संयोजना अंतर्गत अधिकारी/कर्मचाऱ्यांतर्फे गीत व नृत्याचा सदाबहार मनोरंजनाचा कार्यक्रम पार पडला. सांस्कृतीक कार्यक्रमाचे संचालन श्री.असरानी सहाय्यक अभियंता व कु. याशीका जयसवाल कनिष्ठ अभियंता यांनी केले. कार्यक्रमाला मोठया संख्येने अधिकारी/कर्मचारी उपस्थीत होते.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्याकरीता श्री.अे.एम.कोंडावार अधीक्षक अभियंता अउदा (संवसु) प्रविभाग नागपूर, श्री.आर.एस. परूळकर प्रभारी अधिक्षक अभियंता अउदा (संवसु) प्रविभाग नागपूर, श्री.जगन्नाथ चुडे, अउदा बांधकाम प्रविभाग नागपूर, श्री.मोतीसींग चौहान, अधिक्षक अभियंता अउदा स्थापत्य बांधकाम, नि संवसु प्रविभाग नागपूर, श्री. अद्वेत देव, अधिक्षक अभियंता चाचणी व दुरसंचार प्रविभाग नागपूर, श्री.माजिद खान निसार खान सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) परिमंडळ नागपूर व श्री. अभय रोही, सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) परिमंडळ नागपूर व इतर अधिकारी व सहकर्मचारी वर्गानी विशेष परिश्रम घेतले. परिमंडळ कार्यालयानी कंपनीचा वर्धापन दिनाचा कार्यक्रम पार पाडण्याबाबत अउदा (संवसु) प्रविभाग नागपूर या कार्यालयात जबाबदारी सोपविलेली होती. त्या अनुषंगाने अउदा (संवसु) प्रविभागातील सर्व अधिकारी/ कर्मचारी यांचे सुद्धा विशेष सहकार्य लाभले.

## पारेषण प्रविभाग चंद्रपूर येथे कंपनीचा वर्धापन दिन साजरा

दि. ०६/०६/२०१३ ला पारेषण प्रविभाग, चंद्रपूर येथे कंपनीचा ८वा वर्धापन दिन हर्षोल्लासात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मा.एन.एस. तेलतुंबडे, अधिक्षक अभियंता, मा. देशपांडे, कार्यकारी अभियंता, चाचणी विभाग बल्लारशाह व मा.संजय आत्राम, कार्यकारी अभियंता, अउदा (संवसु) विभाग, बल्लारशाह यांनी भव्य केक कापून सर्वाचे अभिनंदन केले.

याप्रसंगी मा.तेलतुंबडे साहेब यांनी मार्गदर्शन करतांना सांगीतले की, कंपनीच्या कामाशी एकनिष्ठ राहून कंपनीच्या पर्यायाने ग्राहकांची सेवा करा. नियमांचे काटेकोर पालन करा. कंपनीचे काम आपले समजून जबाबदारीने केल्यास कंपनीची भरभराट व प्रगती होईल. शेवटी सर्वांचे अभिनंदन करून सर्व कर्मचाऱ्यांना त्यानी शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी मा.घाटे साहेब, उपकार्यकारी अभियंता, मा.निखाते साहेब, व्यवस्थापक (मासं), मा. अलोणे साहेब, व्यवस्थापक (विवले) तसेच प्रविभाग कार्यालयाचे व बल्लारशाह विभाग व वर्धा विभागमधील इंजिनियर्स, तांत्रिक व कार्यलयीन कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## अउदा संवसु मंडळ, कोल्हापुर, अउदा संवसु विभाग कोल्हापुर व चाचणी विभाग कोल्हापुर येथे कंपनीचा ८वा वर्धापन दिन संयुक्तपणे उत्साहात साजरा

दि. ०६.०६.२०१३ रोजी महापारेषण कंपनीचा ८वा वर्धापन दिन अउदा संवसु मंडल, कोल्हापूर, अउदा संवसु विभाग, कोल्हापूर व चाचणी विभाग, कोल्हापूर या कार्यालयाने संयुक्तपणे साजरा केला आहे. श्री.एस.एन. वाटाणे, कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, कोल्हापूर व श्री.बी.डी. बल्लाळ, कार्यकारी अभियंता, चाचणी विभाग, कोल्हापूर यांचे हस्ते केक कापून वर्धापन दिन साजरा केला. सदर कार्यक्रमास श्री.पी.एस. साळे, अधीक्षक अभियंता व इतर सर्व अभियंते / अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

## सांघिक कार्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



भारताचा ६७ वा स्वातंत्र्य दिन १५ ऑगष्ट २०१३ रोजी सकाळी १० वाजता, मुख्य कार्यालय, मुंबई येथे मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

मा. श्री. अरविंद सिंह, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण कंपनी यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. हया प्रसंगी इतर संचालक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री सहायता निधी



महाराष्ट्रातील दुष्काळ निवारणासाठी ''मुख्यमंत्री सहाय्यता निधीस'' महापारेषण कंपनीतील कर्मचाऱ्यांच्या एका दिवसाच्या वेतनाचा धनादेश मा.श्री. पृथ्वीराज चव्हाण, मुख्यमंत्री यांच्याकडे मा.श्री. अजितदादा पवार - उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री, मा.श्री. राजेंद्र मुळक - ऊर्जा राज्यमंत्री यांच्या उपस्थितीत सुपुर्त करतांना मा.श्री. अजय मेहता - व्यवस्थापकीय संचालक, मराविमं सुत्रधारी कंपनी मर्या. तसेच मा.श्री. अरविंद सिंह - अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण सोबत डावीकडे मा.श्री.सुभाष केळकर - कार्यकारी संचालक (मासं), मा.श्री. अनंत पाटील- मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी.

## महापारेषणचा ERP (SAP) प्रकल्प महाराष्ट्र शासनाच्या E-Governance पुरस्काराने सन्मानीतठ

महापारेषण कंपनीला ERP (SAP) प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासनाने E-Governance पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले आहे.

पारदर्शकता, उत्पादीकतेवरील वाढ व कार्यप्रणाली अधिक गतिमान करण्याच्या उद्देशाने महापारेषणन कंपनीने ERP (SAP) चा प्रकल्प सन २००८ मध्ये प्रारंभ केला.

सदर प्रकल्पास सर्मपित असे ''परिवर्तन प्रकल्प'' नावाने संबोधण्यात आले व त्यामुळे कंपनीतील सर्व विभागीय कार्यपध्दतीत आमुलाग्र बदल झाला. सन २०१२ ला हा प्रकल्प कार्यान्वीत (GO-Live) झाला व तद्नंतर कंपनीला वेगळे वळण प्राप्त झाले.

आता हा प्रकल्प यशस्वीरित्या संपूर्णपणे स्थापित झालेला असून व्यवस्थापनाचा काम करण्याच्या वेळेत खूप मोठी बचत होत आहे. पारदर्शकतेमुळे जनसामान्यांना कंपनीच्या संदर्भात अचूक माहिती उपलब्ध होते.

हया सन्मानाने गौरवल्यामुळे संपूर्ण महापारेषण परिवार आपले आभार प्रकट करतो. तसेच पुरस्कार प्राप्त झाल्याने वाढलेल्या जबाबदारीची जाणीव ठेवून ERP (SAP) प्रकल्प पुढेही अधिक प्रभावीपणे उपयोगात आणून कर्मचारी व जनतेस त्याचा लाभ पोहचवण्यात महापारेषण कंपनी कटीबध्द आहे.

## निरोपाचा संदेश!



महापारेषण कंपनीची कामगिरी वरच्या पातळीवर घेवून जाण्यासाठी मला आपण सर्वांनी जे सहकार्य केले त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

पुढे सुद्धा असे सहकार्य तुम्ही व्यवस्थापनाला द्याल व कंपनीला परमोच्च स्थानावर घेवून जाल अशी मला पूर्ण खात्री आहे.

**यू.जी. झाल्टे, संचालक (संचलन)**

## कु. शिवानी परूळकर M.S. करण्याकरीता अमेरीकेला रवाना



कु. शिवानी परूळकर हिने GRE व TOFFIL या परीक्षेमध्ये यश संपादन करून California State University North Ridge येथे Electrical Engineering या विषयात M.S. करण्याकरीता अमेरीकेला २९ जुलै २०१३ रोजी रवाना होत आहे. कु. शिवानी ही अती उच्च दाब संवसु मंडळ नागपुर येथे कार्यकारी अभियंता या पदावर कार्यरत असलेले श्री.राजन श. परूळकर यांची कन्या आहे. तीच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

## चि.प्रणय शेखर खेडकर यांचे शालान्त परिक्षेतीत यश



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या माध्यमिक शालांत परिक्षा इयत्ता १०वी मध्ये, चि. प्रणय शेखर खेडकर हा ९५.६३४ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाला. त्याने यापुर्वी नासा (अमेरीका) आयोजीत स्पर्धेमध्ये ''अंतराळात मानवी वस्ती कशी तयार करावी'' या विषयावर सिद्धांत मांडून जागतिक पातळीवर तृतीय क्रमांक पटकावला. अकोला पारेषण सं व सु विभागातील, श्री.शेखर वामदेवराव खेडकर, सहा. अभियंता यांचा तो मुलगा आहे.

## कु.श्रद्धा ससाणे यांचे शालान्त परिक्षेतील यश



कु.श्रद्धा उत्तम ससाणे यांनी मार्च-२०१३ मध्ये झालेल्या माध्यमिक शालान्त परिक्षेत प्रवरा पब्लिक स्कुल, प्रवरानगर येथुन ८५.२२% टक्के गुण मिळवुन यश संपदान केले आहे. विभागीय कार्यालय बाभळेश्वर येथे कार्यारत असलेले श्री.यु.के. ससाणे उपव्यवस्थापक (विवले) यांची त्या कन्या आहेत. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन.

## मार्च २०१३ च्या (इयत्ता १०वी) माध्यमिक शालांत परिक्षेतील सुयश



महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोली (कळवा) येथील कार्यकारी अभियंता श्री.एस.डी. देवगुणे यांची सुकन्या कु. दिपाली सुरेश देवगुणे, हीने मार्च २०१३ च्या माध्यमिक शालांत परिक्षेत (इ. १०) ९३.२७ टक्के मार्क मिळवून या शाळेतून तसेच ऐरोली नवी मुंबई मधुन प्रथम क्रमांक पटकावला. या यशाबद्दल तिने आपले शिक्षक, आई, वडील, यांना श्रेय दिले आहे. या यशाबद्दल तिचे पारेषण कंपनीतर्फे अभिनंदन

## चि. सर्वेश चे सुयश



चि. सर्वेश उदय येवले याने मार्च २०१३ सी.बी.एस.ई. नवी दिल्ली मंडळाच्या दहावीच्या परिक्षेत ९६.२ टक्के गुण मिळविले आहेत. चि.सर्वेश येवले हा श्री.उदय भालचंद्र येवले, उप-कार्यकारी अभियंता, अउदा बांधकाम मंडळ नाशिक यांचा सुपुत्र आहे. त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## कु.प्रांजल पां. वराडे हिचे दुहेरी यश



भार प्रेषण केंद्र, अंबाझरी नागपूर या कार्यालयात कार्यरत असलेले श्री.पांडूरंग तोताराम वराडे, सहाय्यक अभियंता यांची मुलगी कु. प्रांजल वराडे हिचे 'इंडियन नॅशनल मॅथमॅटिकल ऑलिम्पियाड-२०१३' व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परिक्षा (SSC-2013) हयांत दुहेरी यश केले आहे.

कु. प्रांजल पांडूरंग वराडे हिने 'होमी भाभा सेंटर फॉर सायन्स एज्युकेशन (HBCSE) 'नॅशनल बोर्ड फॉर हायर मॅथमेटिक्स (NBHM)' अणुऊर्जा विभाग, भारत सरकार हयांचे तर्फे घेण्यात आलेल्या 'इंडियन नॅशनल मॅथमॅटिकल ऑलिम्पियाड-२०१३ (INMO-2013)' हया राष्ट्रीय पातळीवरील परीक्षेत तेजस्वी यश संपादीत केले आहे.

तसेच कु. प्रांजल हिने 'माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (SSC-2013)' परिक्षेत ९७.६४% मार्कस मिळवून नागपूर विभागीय मंडळ पातळीवर तिसरा क्रमांक व शाळेतून प्रथम क्रमांक मिळविला. हया दुहेरी यशाचे श्रेय कु.प्रांजल तिचे आईवडील व शिक्षकांना देते.

कु. प्रांजल चे वडील श्री.पांडूरंग तोताराम वराडे हे सहाय्यक अभियंता या पदावर, भार प्रेषण केंद्र, अंबाझरी नागपूर (महापारेषण कं. मर्या.) येथे कार्यरत आहेत.

## कु. मेघा संजय राजपुत यांचे शालान्त परिक्षत यश



कु. मेघा संजय राजपुत यांनी मार्च २०१३ मध्ये झालेल्या माध्यमिक शालान्त परिक्षेत कारमेल कॉन्व्हेंट स्कुल अहमदनगर येथुन ७६.४०% टक्के गुण मिळवुन यश संपादन केले आहे. विभागीय कार्यालय बाभळेश्वर येथे कार्यरत असलेले श्री.एस.बी. राजपुत, प्रमुख लिपीक यांची त्या कन्या आहेत. त्यांच्या या यशबद्दल त्याचे हार्दिक अभिनंदन.

## कु. रेणुका आघाव यांचे शालान्त परिक्षेत यश



कु. रेणुका अनिल आघाव यांनी मार्च २०१३ मध्ये झालेल्या माध्यमिक शालान्त परिक्षेत प्रवरा कन्या विद्या मंदिर, लोणी येथुन ८२% टक्के गुण मिळवुन यश संपादन केले आहे. विभागीय कार्यालय वाभळेश्वर येथे कार्यरत असलेले श्री.ए.यु. आघाव, कार्यकारी अभियंता यांची त्या कन्या आहेत. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन.

## Self Discipline to enable discipline in the organization

Sachin Tendulkar said "Discipline & Hard Work is the key to achieve success in life". When I introspect on this through, I realized that all great personalities were highly disciplined in their life. To become indiscipline takes no time but to be discipline requires determination & dedication. Thus, there are co-related terms.

One philosopher pronounced theory of 3C's, never Cry, never Criticize and never Condemn. I like to mention theory of 3 D's, ever Discipline, ever Dedication and ever Determination. One who is discipline is likely to be well organized, methodological, articulate and balanced. Because, one cannot be disciplined without planning and proper Management of Self.

Discipline helps to improve our work & conduct. Also one remains focused on the goals and targets. Disciplines should not be imposed; rather it should be invoked from within. Like self-motivation, it is self-disciplines. Not only in work, but in all respect one should be disciplined. It is not confined to punctuality, attendance, regularity but should cover way we do our work and how we conduct.

Organization is immensely benefited if its staff is self-disciplined. It carries good image of the company. Indirectly, it benefits in enhancing productivity and efficiency of the organization. Otherwise, organization is required to spend its energy in enforcing discipline in the organization which is counter-productive. MNCs like Sony, Nokia, Apple, Microsoft, etc. are known for their discipline. They do not deviate from their SoPs and are able to maintain their leadership positions.

The progress and prosperity should make individual and organization more disciplined. Those who are able to maintain their discipline are seen sustaining their good work and progress. It does not take much time to be indiscipline. A thought of compromise, temptation, negligence, lethargy and complacency can make us indiscipline therefore we must ensure that these thoughts do not come in our mind and we remain disciplined.

I read Bill Gates, the CEO of Microsoft Inc., saying that One who does not have time, most likely not able to manage their time well. Thus, time management is essential for maintaining disciplined life.

In the organization parlance there are rules and regulation related to Service Conditions, Financial Regulations, Technical Standards and SoPs, established Practices, Customs and Traditions. They are to be followed scrupulously. They are age-old, time-tested, and hence need not to be challenged. They are modified as and when required. In case, relevant changes are not made, they are to be brought up to the notice of the concerned authorities, who will make required changes.

Some intelligent among us try to find out loopholes/ short-cut in these aspects, because it gives them quick success. However in order to achieve sustainable progress, every efforts are required to be taken. It is beneficial for the organization in long run.

We have seen financial meltdown of the glob due to greediness of intellectual community. Now we must encourage full proofing the system, such that no indiscipline to be occurred.

I look forward your support and co-operation in this endeavor.

संपादक : श्री.मधुसुदन देशमुख, कार्यकारी अभियंता (प्रशिक्षण), प्रभारी जनसंपर्क अधिकारी
E-mail : prohr@mahatransco.in
**पत्रव्यवहाराचा पत्ता** : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत,
महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं. सी. - १९, ई. ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by PRO **For Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts :** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka,
W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai - 400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra Kurla Complex, Mumbai - 400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.